भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०७/२०१७

**१) बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक २५/०७/२०१७ चे २०.३० वा दर. यातील फिर्यादी सौ. प्रभावती घनश्याम मेश्राम वय ५४ वर्ष, रा. पेट्रोल पंप ठाणा ही तुमसर ते नागपुर बसने प्रवास करीत असतांनी पेट्रोल पंप ठाणा येथे बस मधुन बॅग घेवुन खाली उतरत असतांनी बॅग मध्ये ठेवलेले १ सोन्याची काळी पोथ मंगळसुत्र असलेली २५ ग्रॅम, सोन्याचे कानातील वेल ४ ग्रॅम, सोन्याचे डोरले २ ग्रॅम, व नगदी ४,०००/–रु. असा एकुण ४१,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने संधी साधुन बॅगमधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी तक्रार वरुन पो.स्टे जवाहरनगर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगिर पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) लोकसेवकाने जारी केलेल्या आदेशाची अवहेलना केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०६/२०१६ ते आज पावेतो. यातील फिर्यादी खुशाल कुंजाराम कंळबे वय २७ वर्ष, मुख्याधापिका नगर परीषद भंडारा यांनी नमुद आरोपींना अवैध बांधकाम काढुन टाकण्याचे वेळोवेळी नोटीस बजावुन सांगितले परंतु आरोपींनी लोकसेवकाने जारी केलेल्या कायदेशिर आदेशाची अवहेलना केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट पो.स्टे भंडारा येथे कलम ५२(१)(भ) माहाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनीयम १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगे पो.स्टे. भंडारा हे करीत आहे

**३) बैलाने मारुन शेतावर मृत अवस्थेत इसम मिळुन आला . :–**

दिनांक २९/०८/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील मृतक राजु उर्फे राजेन्द्र नारायण चोपकर वय ४३ वर्ष, रा. कोथुर्णा हा आपले शेतावर गाई, गोऱ्या व बैल घेवुन गेला असता शेतात बैलाने मृतक याला सिंगाने मारुन जखमी केले असे फिर्यादीस मुकेश सोनटक्के यांनी माहिती दिली असता फिर्यादी व गावकऱ्यांसह मृतकचे शेतावर गेले असता मृतक हा शेतावर मृतअवस्थेत मिळुन आल्याने त्याचे शरीरावर, पोटावर, मोंडयावर, बैलाचे शिंगाचे व्रण मिळुन आल्याने फिर्यादी मुरलीधर नारायण चोपकर वय ४१ वर्ष, रा. कोर्थुणा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २९/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११६ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.